# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०६/२०१८

**१) विवाहीतेला शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने छळाला कंटाळुन गळफास लावुन आत्महत्या केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०६/०६/२०१८ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. सविता संजयकुमार टेंभरे वय २५ वर्ष, रा. खर्रापाठ जि. शिवनी हीला आरोपी पती संजयकुमार याने गाडी घेण्याकरीता पैश्याची मागणी करुन शारीरीक व मानसिक त्रास देवुन मारहान केले व आरोपीचे दुस—या मुली सोबत अनैतीक संबध असल्याने आरोपीने मृतक सविता हीला घरा बाहेर काढण्याची धमकी दिल्याने मृतक सविता ही आरोपीचे छळाला कंटाळुन नमुद घटनेवेळी गळफास घेवुन आत्महत्या करुन मरण पावल्याने फिर्यादी हरेन्द्रसिंह देवीसिंह ठाकुर वय २६ वर्ष, रा. निवारी त. बालाघाट जि. शिवनी मध्य प्रदेश यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४९८(अ), ३०६भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. मेश्राम पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) चिखला माईल्सचे सितासांवगी क्वॉर्टरचे बांधकामात असलेला लोहा चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०५/०६/२०१८ चे १७.०० ते ०६/०६/२०१८ चे १०.१० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रणव रामरंजनकुमार वय २५ वर्ष, रा. झार क्र. ११४ शनवारी जलालपुर जि. छपडा ह. मु. सितासांवगी हा काम पाहत असलेल्या चिखला माईल्सचे सितासावंगी येथे असलेल्या क्वॉर्टरचे बांधकामात सुरु असलेल्या ठिकाणी ठेवलेला लोहा निर्माण कंपनीचा १६ एमएम चे ३ बंडल २८५ किलो किंमती ११,७१०/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**३) मोटारपंपची चोरी :—**

दिनांक ०४/०६/२०१८ ते ०६/०६/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी किशोर दुधराम काटेखाये वय ३८ वर्ष, रा. खातखेडा हा व त्याचे बाजुचे पंढरी सेलोकर रा. सावरला याचे गोसे खुर्द नहराचे उजव्या कालव्यातील शेतीला पाणी देण्याकरीता लावलेली एम कंपनीची ५ एचपीची ईलेक्ट्रीक मोटारपंप, सिलकर ७.५ एचपी ओपन मोटर क्र. १४४ बी.पी. क्र. २ सीजी ०८४८० ईलेक्ट्रीक मोटारपंप असा एकुण २०,०००/—रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. राहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) बिनापासरपरवाना रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०६/०६/२०१८ चे ०६.३० ते ०८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे पोलीस विभागातील लोकसेवक असुन वरील कार्यालय पोलीस अधिक्षक कार्यालय पोलीस अधिक्षक कार्यालयात दोषसिध्दी कक्ष भंडारा येथे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने अवैधरित्या रेती वाहतुक करणाऱ्या ईसमावर कारवाही करत असतांना यातील नमुद आरोपी हे अवैधरित्या बिनापास परवाना ट्रॅक्टर मालकाचे सांगण्या वरुन ट्रॅक्टर चालकाने २ ब्रास रेती किंमती ४,०००/—रु. ची चोरी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. आडोळे दोष सिध्दी कक्ष पा. अ.कार्यालय भंडारा रेड पथक यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१०९,३४ भादवी. सहकलम १३०(१)(३)/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) संगनमत करुन जागेच्या वादावरुन भांडण व शिवीगाळ करुन दगड विटांनी मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०६/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी देवानंद रामचंद्र ऊके वय ३७ वर्ष, रा. परसोडी हा व जखमी व आरोपीतांचे घर हे एकमेकांचे घराला लागुन असुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन घराचे जागेच्या भांडण, शिवीगाळ करुन चपलांनी तसेच दगड विटांनी डोक्यावर, पोटावर फिर्यादीस मारुन आपखुशीने दुखापत केल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

६) संगनमत करुन डोक्यावर डावे बाजुला गिट्टीने मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०६/०६/२०१८ चे १६.३१ वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व तिचा पती अंबरदास साखरे यांना शिवीगाळ करुन तुला जिवाने मारल्याशिवाय राहणार नाही अशी धमकी देवुन लाथा बुक्यांनी मारपीट केली व आरोपी क्र. ०२ ने फिर्यादीचे डोक्यावर डावे बाजुला गिट्टी ने मारुन दुखापत केल्याने फिर्यादी सौ. शांताबाई अंबरदास साखरे वय ५५ वर्ष, रा. पोहरा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,३२,५०६,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

७) ट्रकच्या धडकेत दोन जखमी :–

दिनांक ०६/०६/२०१८ चे १२.१५ वाजता दरम्यान यातील मोटार सायकल क्रमांक क्र. एमएच ३६ वाय १९१२ चे चालकास यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने एनएच ६ हायवे रोडवर कट मारुन धडक दिल्याने मोटार सायकल चे चालक किसन खरकाटे हे स्टेपनीवर आढळल्याने गंभिर जखमी होण्यास व मागे बसलेला त्याचा मित्र श्रीकृष्ण बांगळकर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. घरडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

८) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०२/०६/२०१८ चे १२.०० ते १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ९ महीने १४ दिवस हिला यातील संशयीत आरोपीने मोटार सायकलवर बसवुन फिर्यादीचे ताब्यातुन पळवुन नेले असावे असे फिर्यादी रविन्द्र बघाजी. काळसर्पे वयं ४७ वर्ष, रा. किन्ही एकोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

९) मोटार सायकल स्लीप होवुन स्वत: जखमी होवुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–

दिनांक ११/०५/२०१८ चे १६.३० वाजता ते ०६/०६/२०१८ चे १५.१० वाजता दरम्यान यातील आरोपी मृतक दिनेश मोहतुरे वय ३५ वर्ष, रा. गुराडा हा दिनांक ११/०५/२०१८ ला आपले मोटार सायकल क्रमांक क्र. एमएच ३६ वाय १४२८ ने डबलसिट बसवुन राजीव गांधी चौकाकडे १६.३० वा. जात असतांना मोटार सायकलचे ब्रेक मारल्याने मोटार सायकल ही स्लीप होवुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे बेहोश अवस्थेत भरती केले असता उपचारा दरम्यान दि ०६/०६/२०१८ चे १५.१० वा. मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन व अपघात रजीस्टर क्र. ४१/१८ दिनांक ११/०५/२०१८ अन्वये चे चौकशी वरुन सरतर्फे फिर्यादी पोना. शहारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१०)गळफास लावुन महिलेचा मृत्यु :–

दिनांक ०५/०६/२०१८ चे २४.०० वाजता ते ०६/०६/२०१८ चे ००.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीची मृतक पत्नी सौ. सविता संजय टेंभरे वय २५ वर्ष, रा. कोबरा बटालियन २०६ चितापुर हीने क्वार्टर मधील बेडरुम मध्ये सिलींग फॅनला गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी संजय कुमार टेंभरे वय ३२ वर्ष, रा. कोबरा बटालियन २०६ चितापुर (शिपाई) यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनि. मानकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

११) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान वृध्दाचा मृत्यु :–

दिनांक २४/०५/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील मृतक कारुजी कवडुजी चुधरी वय ७२ वर्ष, रा. भुयार याने दारु मध्ये कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बिसने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१२) डोक्याला मार लागुन उपचारा दरम्यान वृध्देचा मृत्यु :–**

दिनांक २४/०५/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती कमळजाबाई बारु परतेकी वय ७५ वर्ष, रा. साकोली हा बाथरुम मध्ये पाय घसरुन पडल्याने तिचे डोक्याला मार लागुन तीला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**१३) अवैध हातभट्टी,देशी / जुगार दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०६/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन आंधळगाव व अडयाळ येथे हातभट्टी, देशी दारु/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी किंमती ५००/–रु. तसेच जुगारातुन किंमती ५१५/–रु. असा एकुण १,०१५/–रु. माल जप्त करण्यात आला.

**१) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०६/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०३, तीन सिटर वाहनाकरीता– ०८ ईतर वाहनांवरती – १११ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.